


# हवामान बदल एक जागतिक पर्यावरणीय समस्या: संघटना, धोरण आणि अंमलबजावणी

• प्रो. डॉ. चंद्रकांत बंशीधर भांगे • श्री. देविदास विजय भोसले



Scanned with OKEN Scanner

All rights are reserved. No part of this publication may be reproduced, stored in a retrieval system or transmitted in any form or by any means, electronic, mechanical, photocopying, recording or otherwise, without the prior permission of the copyright holder.

| | | |
|---|---|---|
| Editor | : | प्रो. डॉ. चंद्राकांत वंशीधर भांगे & श्री. देविदास विजय भोसले |
| Publisher | : | **Swaranjali Publication**<br>Sector 10-B, Vasundhara,<br>Ghaziabad, (U.P.) 201012 |
| Phone | : | 9810749840, 8700124880 |
| E-mail | : | swaranjalipublication@gmail.com |
| Website | : | www.swaranjalipublication.com |
| Book | : | हवामान बदल एक जागतिक पर्यावरणीय समस्या: संघटना, धोरण आणि अंमलबजावणी |
| Edition | : | January 2021 |
| ISBN | : | 978-93-90573-36-3 |
| Price | : | 499/- |
| Printed By | : | Swaranjali Printers |

# 8

## पर्यावरण सुरक्षा व समस्या

प्रा. दिपकराव वी. देवरे

मानव व पर्यावरण यांचा अतूट असा परस्परसंबंध पृथ्वीच्या व मानवाच्या निर्मितीपासूनच निर्माण झालेले आहेत. किंबहुना अनुकूल पर्यावरणात मानवाचा विकास होऊ शकतो. पर्यावरणातील विविध घटकांमध्ये परस्परक्रिया प्रतिक्रिया सतत सुरू असतात. या क्रिया प्रतिक्रियांचे नियमन निसर्गतः होत असते. पर्यावरण संतुलन राखण्याची स्वयंचलित व स्व नियंत्रण यंत्रणा निसर्गाजवळ आहे .परंतु अलीकडच्या काळात निसर्गात मानवी हस्तक्षेप वाढल्यामुळे असंतुलन निर्माण झाले आहे. त्यातून अनेक प्रकारच्या पर्यावरणीय सुरक्षा समस्या ह्या निर्माण झाल्यात ह्या पर्यावरणीय सुरक्षा समस्या जागतिक स्वरूपाच्या आहेत. त्यामुळेच 1972 मध्ये स्टॉकहोम येथे झालेल्या जागतिक परिषदेत पर्यावरणीय सुरक्षा समस्यांवर सर्वाधिक चर्चा झाली. तेव्हापासूनच जगातील सर्व देशांचे लक्ष ह्या जागतिक समस्या कडे वेधले गेले. कोणत्याही देशाचा आर्थिक विकास साधताना पर्यावरणाचा समतोल राखणे अत्यंत आवश्यक असल्याची जाणीव प्रत्येक राष्ट्र शासन व समाजाला होऊ लागली.

सूर्यमालेतील पृथ्वी हा एक प्रमुख ग्रह आहे. याचा पृथ्वीवर असलेल्या अनुकूल परिस्थितीमुळे सजीवांची वाढ व त्यांचा विकास मोठ्या प्रमाणात झाला या परिस्थितीलाच पर्यावरण असे म्हणतात. यामध्ये प्रामुख्याने हवा पाणी भूमी सर्व प्रकारच्या वनस्पती व साधन संपत्ती इत्यादींचा समावेश होतो या सर्वांची मिळून जी परिस्थिती निर्माण होते त्याला पर्यावरण असे म्हणतात. पर्यावरणातील अनुकूल असलेले हे घटक सजीवांसाठी अत्यंत आवश्यक आहेत हे सर्व पर्यावरणातील घटक परिवर्तनशील आहेत या परिवर्तनांचा परिणाम देशावर व त्यातील मानवावर होत असतात. मानव सजीवांमध्ये सर्वात बुद्धिमान व क्रियाशील म्हणून ओळखला जातो. मानवाने याच पर्यावरणाच्या सहकार्याने आपला सर्वांगीण विकास घडवून आणलेला दिसतो. मानवाने जे बदल घडवून आपला विकास केलेला आहे. त्याचे दूरगामी परिणाम पर्यावरणावर होत आहेत यातूनच पर्यावरणाची सुरक्षा किंवा समस्या निर्माण झाली आहे. म्हणजेच मानवी जीवनाच्या विकासाचे प्रक्रिया ही नैसर्गिक परिवर्तनावर आधारित आहे. मानवी समाजसंस्था मानवाचे आर्थिक व्यवहार मानवाचे राहणीमान व मानवाची संबंधित सर्व घटकांचा संबंध पर्यावरणाशी असल्यामुळेच पर्यावरणीय सुरक्षा किंवा समस्या निर्माण झालेली आहे.

**अर्थ-** पर्यावरणीय धोके हे अतिशय दूरगामी धोके असून त्यांचे स्वरूप जागतिक पक्षाच्या इतर धोक्यापेक्षा खूप गंभीर आहे. पर्यावरणीय धोक्यामुळे होणारी जीवित आणि व वित्तहानी अमर्यादित अशी असते. जगातील सर्व देशांच्या एकत्रित प्रयत्नांची त्यावर तोडगा काढता येईल. नैसर्गिक संसाधनांची कमतरता उर्जेसाठी चा संघर्ष पाणी आणि खाद्यान्नाची निर्माण झालेली चनचन यामुळे जगातील अनेक क्षेत्रांमध्ये अशांतता निर्माण झालेले आहे. त्यामुळे सुरक्षित समोर एक मोठे आव्हान उभे राहिले आहे.

**पर्यावरण असंतुलनाच्या दुष्परिणाम प्रारंभ-**



Scanned with OKEN Scanner

निसर्गाचे व पर्यायाने पर्यावरणाचे ढासळते संतुलन, त्यामुळे जागतिक हवामानात होणारे विनाश बदल, वैश्विक तापमान वृद्धी या भयावह समस्यांचे महाभयंकर रूप अजून पुरते समोर आलेले नसले, तरी त्य दुष्परिणामांना आत्ता प्रारंभ झालेला आहे. एका अर्थाने एकविसाव्या शतकात जगाच्या सुरक्षेला कोणताही किंवा दहशतवादी संघटना याहीपेक्षा पर्यावरणाच्या ढासळलेल्या संतुलनना मुळे निर्माण झालेली असुरक्षा अ धोकादायक असल्याचे जगातील अनेक सुरक्षाविषयक तज्ञांचे एकमत आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे प्रदूषणामुळे यात सातत्याने भर पडत आहे.

चिकुन गुनिया, स्वाईन फ्लू आणि इबोला याबरोबरच आत्ताचा चीनमधून संपूर्ण जगात प्रादुर्भित झाले covid-19 म्हणजेच कोरोना यासारखे जीवघेणे आजार वेगवेगळ्या स्वरूपात वाऱ्याच्या वेगाने पसरत आहेत मधुमेह, हृदय रोग, रक्तदाब या आजारांचे प्रमाणही वेगाने वाढते आहे. ऊर्जा साधने, नैसर्गिक साधनसंपदा, अन्न आणि पाणी यांची वाढती चणचण यामुळे जगातील सर्वच खंडांमध्ये समस्या वाढलेल्या आहेत. या बदललेल्या जागतिक परिस्थितीमुळे पुढचे महायुद्ध पाण्यासाठी किंवा खनिज तेलासाठी लढले जाईल असे तज्ञांचे मत आहे.

सुरक्षा समस्यांमध्ये आज सर्वाधिक महत्त्व हे पर्यावरणा सारख्या गैर लष्करी विषयाला मिळवू लागले आहे. गेल्या काही काळापासून पूर, भूकंप, वादळ, बर्फवृष्टी, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तींची संख्या व त्यामु झालेली आणि प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे. पर्यावरणाच्या समस्येने संपूर्ण पृथ्वीचा अस्तित्व पन्नास लागलेले आहेत.

पर्यावरण म्हणजे आपल्या सभोवतालची परिस्थिती ज्यात जमीन हवा पाणी या तीन घटकांचा समावेश होतो.

**पर्यावरण असंतुलन सर्वात मोठी समस्या-**

पर्यावरण समस्या ला आज सर्वात मोठे वैश्विक समस्या मानले जाऊ लागले आहे. वाढते औद्योगिकीकरण, नैसर्गिक संसाधनांचे बेरेमाप वाढ, लोकसंख्या वृद्धि यामुळे पर्यावरणाची समस्या दिवसेंदिवस गहन होत चाललेली आहे. त्याचा दुष्परिणाम हवामानाच्या पद्धतीवर होतो आहे. पृथ्वीतलावरील सर्व सजीवांसाठी हवा व पाणी यांची गरज हे प्राथमिक गरज आहे. तीच प्रदूषित झाली तर सर्व सजीवांना जगणे अशक्यप्राय होईल नवे झालेले आहे.

प्रदूषणाचे असंख्य प्रकार आहेत त्यात वायू प्रदूषण , जल प्रदूषण, ध्वनी प्रदूषण हे प्रमुख आहेत. प्रदूषणामुळे जमीनीवरील मातीच नव्हेतर, मातेचे दूधही प्रदूषण झाले आहे. आज मोठ्या प्रमाणात जंगले तोडली जात आहे 1950 पासून आजपर्यंत अर्ध जंगल विविध कारणांमुळे नष्ट झाले आहेत. यामुळे जमिनीची धूप होऊन सुपीक जमिनीचे प्रमाण कमी होत आहे. वैज्ञानिक पद्धतीने करण्यात येणारे मासेमारी, समुद्राच्या पाण्यात सोडले जाणारे प्रदूषित पाणी, तेलगळती ,अपघात, तेल विहिरींमधून होणारे प्रदूषण यामुळे समुद्राचे संतुलन बिघडले आहे .याचे अनेक दुष्परिणाम मानवाला दीर्घकाळ भोगावे लागणार आहेत.

आजवर मानवाने पर्यावरणाला अनुसरूनच त्याच्या सर्व बाबी व जीवनशैली विकसित केल्या आहेत. पर्यावरणात होणाऱ्या बदलांचे ही मानवाने स्वतःला जुळवून घेतले आहे. मानवाच्या उत्क्रांतीमध्ये तसेच मानवी संस्कृतीच्या विकासात आणि अस्तित्वात निसर्ग किंवा पर्यावरणाचे स्थान अनन्य साधारण असेच आहे. सुरक्षेला निर्माण झालेला हा असा पहिला धोका आहे जो लष्करी नाही. पर्यावरण सुरक्षा ही राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय सुरक्षेतील नवीनतम असे संज्ञा आहे. पर्यावरण सुरक्षा ही संज्ञा सर्वप्रथम 1962 मध्ये आंतरराष्ट्रीय संबंधाचे तज्ञ अरनॉल्ड यांनी प्रचलित केली.



Scanned with OKEN Scanner

पर्यावरण सुरक्षेविषयी जागरूकता निर्माण व्हावी या दृष्टीने जगात काही अशासकीय आंतरराष्ट्रीय संस्था स्थापन झाल्या. त्यात 1961 मध्ये वर्ल्ड वाईड फंड, 1969 मध्ये फ्रेंड ऑफ अर्थ व 1971 मध्ये ग्रीनपीस यांचा समावेश आहे. पर्यावरणाचे संतुलन ही केवळ एक आंतरराष्ट्रीय सुरक्षेची समस्या नाही तर ती संपूर्ण मानव जातीच्या अस्तित्वाची ही समस्या नाही तर ती संपूर्ण सजीव सृष्टी आणि या वसुंधरेच्या अस्तित्वाची समस्या आहे. पर्यावरण सुरक्षा ही शांतता राष्ट्रीय सुरक्षा आणि मानवी हक्क यांचाही महत्त्वपूर्ण पैलू आहे. येत्या 100 वर्षात या समस्येत आणखीनच भर पडलेली असेल असे वाटते. नैसर्गिक साधनांचा उपयोग रोखणे सजीव सृष्टीची पुनर्स्थापना पर्यावरण असंतुलन आला प्रतिबंध पर्यावरणस्नेही विकास आणि निसर्गाची अवनती थांबवणे या विविधांगांनी पर्यावरण सुरक्षा या विषयाचा अभ्यास करणे त्यासाठी आवश्यक आहे.

**संदर्भ ग्रंथ-**


1. डॉ. व्ही. जे. पाटील- पर्यावरण शास्त्र, प्रशांत पब्लिकेशन जळगाव-2004
2. डॉ. कविता धर्माधिकारी डॉ. तोडकर डॉ. विसपुते -जागतिक सुरक्षा, प्रशांत पब्लिकेशन 2015.
3. डॉ. देवेंद्र विसपुते -आंतरराष्ट्रीय सुरक्षा समस्या, प्रशांत पब्लिकेशन 2020.





Scanned with OKEN Scanner